*मुस्लीम समाजबांधवांच्या पाठिशी आमदार म्हणून नव्हे तर त्यांचा भाऊ म्हणून सर्वशक्तीनिशी उभा राहणार – सुधीर मुनगंटीवार*
*मुस्लीम समाजबांधवांनी सुधीर मुनगंटीवार यांना बहुमताचा कौल द्यावा – हाजी हैदर* आजम
*सर्व समाजांचा सुधीर मुनगंटीवार यांना वाढता पाठींबा*
==========================================================================

या मतदार संघाचा विकास करताना, जिल्हयाचा विकास करताना, राज्याचा विकास करताना मी कधिही जात, धर्म असा भेद बाळगला नाही. जातीधर्माच्या पुढे जात सर्वसमावेशक विकास करण्याचा प्रयत्न केला. राजकारण हे माझ्यासाठी समाजसेवेचे मिशन आहे. धर्म कोणताही असो, जात कोणतीही असो प्रत्येकाच्या रक्ताचा रंग हा लालच असतो. मुस्लीम समाजातील भगिनींसाठी बचतगटांची निर्मीती करून त्यांच्या आर्थीक सक्षमीकरणासाठी मोठी चळवळ आपण उभी केली आहे. मी या सर्व भगिनींना आश्वस्त करू इच्छीतो की या विभागाचा आमदार म्हणून नाही तर तुमचा भाऊ म्हणून सर्वशक्तीनिशी तुमच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

दिनांक 7 ऑक्टोबर रोजी बल्लारपूर शहरातील संत तुकाराम महाराज सभागृहात हाजी बांधवांचा सत्कार तसेच अल्पसंख्यांक पदाधिका-यांच्या सम्मेलनात सुधीर मुनगंटीवार बोलत होते. यावेळी मंचावर मौलाना आझाद आर्थीक विकास महामंडळाचे अध्यक्ष हाजी हैदर आजम, वनविकास महामंडळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, श्रीमती परवीन मोमीन, शेख जुम्मन, उस्मानभाई, भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, सज्जाद अली आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, नागपूरातील ताजुद्दीन बाबाच्या दरगाहसाठी आपण निधी उपलब्ध केला आहे. अल्पसंख्यांक समाजासाठी औरंगाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठ आपण निर्माण करीत आहोत. बल्लारपूर शहरात नाटयगृह, पोलिस स्टेशन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सैनिकी शाळा, बॉटनिकल गार्डन, स्टेडियम आदी विकासकामांसह कब्रस्तानसाठी सुध्दा आपण निधी उपलब्ध केला आहे. शहरातील मुस्लीम समाजबांधवांची शादीखाना बांधण्याची मागणी आहे. ती मागणी सुध्दा आपण प्राधान्याने पूर्ण करू तसेच युवकांसाठी वाचनालय उपलब्ध करत कब्रस्तानच्या जागेचा प्रश्न सुध्दा सोडवू, असे आश्वासन त्यांनी यावेळी बोलताना दिले.

यावेळी बोलताना मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष हाजी हैदर आजम म्हणाले, महामंडळाच्या माध्यमातुन शैक्षणिक कर्ज असो वा अन्य योजनांसाठी जेव्हा आम्ही सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे निधीची मागणी केली तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी निधी मंजूर केला व मुस्लीम बांधवांसाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिली. मुस्लीम युवकांना शैक्षणिक कर्ज आपण उपलब्ध केले आहे. मोदी सरकारने मदरशांसाठी निधी उपलब्ध केला आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी नेहमीच मुस्लीम बांधवांच्या हिताची भुमीका घेतली आहे. मुस्लीम समाजबांधवांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांना प्रचंड बहुमताचा कौल बहाल करावा असे आवाहन हाजी हैदर आजम यांनी केले. यावेळी श्रीमती परवीन मोमीन यांचेही भाषण झाले. या कार्यक्रमाला हाजी उस्मानभाई, जुम्मन रिजवी, आमीन शेख, साजीद कुरैशी, सलीम शेख, आरीफभाई, अबराल शेख, शब्बीर शेख, नसीफ अन्सारी, रूबाब अहमद, मौलाना असदानी, मतीन कुल रहेमान आदी मुस्लीम समाजबांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन काशी सिंह यांनी केले.

यावेळी मुस्लीम समाजातील महिलांनी सुधीर मुनगंटीवार यांचा भावपूर्ण सत्कार केला. सुधीर मुनगंटीवार यांना सर्व समाजांचा वाढता पाठींबा मिळत असल्याचे आजच्या सम्मेलनातुन दिसून आले.